# Vidyawarta®

Issue-47, Vol-02, July to Sept. 2023
Peer Reviewed International Multilingual Research Journal

Editor
Dr.Bapu G. Gholap

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

July To Sept. 2023
Issue 47, Vol-02

Date of Publication
01 July 2023

**Editor**
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

**विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली**
**नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले**
**वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले**

**-महात्मा ज्योतीराव फुले**

❖ **विद्यावार्ता** या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Date of Publication
01 July 2023

# Vidyawarta™

## International Multilingual Research Journal

www. विद्यावार्ता .कॉम
YouTube Channel

*Vidyawarta is peer reviewed research journal. The review committee & editorial board formed/appointed by Harshwardhan Publication scrutinizes the received research papers and articles. Then the recommended papers and articles are published. The editor or publisher doesn't claim that this is UGC CARE approved journal or recommended by any university. We publish this journal for creating awareness and aptitude regarding educational research and literary criticism.*

*The Views expressed in the published articles, Research Papers etc. are their writers own. This Journal dose not take any libility regarding appoval/disapproval by any university, institute, academic body and others. The agreement of the Editor, Editorial Board or Publicaton is not necessary. Editors and publishers have the right to convert all texts published in Vidyavarta (e.g. CD / DVD / Video / Audio / Edited book / Abstract Etc. and other formats).*

***If any judicial matter occurs, the jurisdiction is limited up to Beed (Maharashtra) court only.***

Indexed

Impact Factor 9.154 iijif

Govt. of India,
Trade Marks Registry
**Regd. No. 2611690**

Harshwardhan Publication Pvt.Ltd. • International Multilingual Research Journal • Certified Quality Management System ISO 9001:2015

http://www.printingarea.blogspot.com

# Editorial Board & review Committee


- **Chief Editor**

**Dr Gholap Bapu Ganpat**
Parli_Vaijnath,Dist. Beed Pin-431515 (Maharashtra)
9850203295, 7588057695
vidyawarta@gmail.com

- **M.Saleem**

saien Ghulam street
Fatehgarh Sialkot city
Pakistan. Phone Nr. 0092 3007134022
saleem.1938@hotmail.com

- **Dr. Momin Mujtaba**

Faculty Member,Dept. of Business Admin.
Prince Salman Bin AbdulAziz University
Ministry of Higher Education,Kingdom of Saudi Arabia, Tel No.: +966-17862370 Extn: 1122

- **N.Nagendrakumar**

115/478, Campus road,
Konesapuri, Nilaveli ( Postal code-31010),
Trincomalee, Sri Lanka
nagendrakumarn@esn.ac.lk

- **Dr. Vikas Sudam Padalkar**

vikaspadalkar@gmail.com
**Cell.** +91 98908 13228 (India),
+ 81 90969 83228 (Japan)

- **Dr. Wankhede Umakant**

Navgan College, Parli –v Dist. Beed
Pin 431126 Maharashtra
Mobi.9421336952
umakantwankhede@rediffmail.com

- **Dr. Basantani Vinita**

B-2/8, Sukhwani Paradise,
Behind Hotel Ganesh, Pimpri,
Pune-17 Cell: 09405429484,

- **Dr. Bharat Upadhya**

Post.Warnanagar, Tq.Panhala,
Dist.Kolhapur-4316113
Mobi.7588266926

- **Jubraj Khamari**

AT/PO - Sarkanda, P.S./Block - Sohela
Via/Dist. - Bargarh, Pin - 768028 (Orissa)
Mob. No. – 09827983437
jubrajkhamari@gmail.com

MISS. VARSHA ANILRAO TIDKE
FULE-AMBEDKAR COLLEGE OF SOCIAL WORK,
HANUMAN NAGAR, REVENUE COLONY, GADCHIROLI
9421857700
varshaatidke21@gmail.com

- **Dr. Wagh Anand**

Dept. Of Lifelong Learning and Extension
Dr B A M U Aurangabad pin 431004
Mobi. 9545778985
wagh.anand915@gmail.com

- **Dr. Ambhore Shankar**

Jalna,Maharashtra
shankar296@gmail.com
Mobi.9422215556

- **Dr. Ashish Kumar**

A-2/157, Sector-3, Rohini, Delhi -110085
*Ph.no:* 09811055359

- **Prof. Surwade Yogesh**

Dept. Of Library, Dr B A M U Aurangabad , Pin 431004
**Cell No:** +919860768499
yogeshps85@gmail.com

- **Dr.Deepak Vishwasrao Patil,**

At.Post.Saundhane, Near
Kalavishwa Computer, Tq.Dist.Dhule-424002.
Mobi. 9923811609
patildipak22583@gmail.com

- **Dr.Vidhya.M.Patwari**

Vanshree Nagar,Behind Hotel
Dawat, Mantha Road, Jalna-431203
Mobi.9422479302
**patwarivm@rediffmail.com**

- **Dr.Varma Anju**

Assistant Professor, Dept. of Education,
Sikkim University 6th Mile, Samdur Tadong-737102
GANGTOK - Sikkim, (M.8001605914)
anjuverma2009@rediffmail.com

- **Dr. Dinesh Kumar Charan**

Associate Professor and HOD-History Dept.,
Govt.Lohia College Churu (Rajasthan) India
Pin- 331001
**Mob. No.-9414305804**

Vidyawarta ®

Please Scan QR Code & Connect to us

GET IT ON Google Play

Subscribe to our YouTube Channel

PhonePe

ACCEPTED HERE

Scan & Pay Using PhonePe App

9850203295
7588057695

WhatsApp

VIDYAWARTA

विद्यावार्ता : Interdisciplinary Multilingual Refereed Journal Impact Factor 9.154 (IIJIF)

39) डॉ. बाबासाहेब आंबेडकर व हिंदू कोड बिल एक अभ्यास
**प्रा. डॉ. विद्यासागर पु. सोनकांबळे, जि. जालना** ||158


40) सद्यस्थितीतील भारतातील राजकीय पक्ष एक दृष्टिक्षेप
**प्रा.डॉ. शिवाजी गोविंद दिवाण, जि. बीड** ||161

41) अवधी लोकोक्तियों में माघ मास का मौसम विज्ञान से अन्तर्सम्बन्ध
**प्रो. हरीशकुमार शर्मा, श्रीमती कुसुम देवी, सिद्धार्थनगर** ||165

42) कालिदास के काव्य में सामाजिक चित्रण
**डॉ०सूर्यभान मिश्र, कुशीनगर** ||169

43) लाखनी तालुक्यातील वर्तमानपत्र विक्रेते मुलांचा आर्थिक सामाजिक अभ्यास
**प्रा. डॉ. सुरेश बन्सपाल, जि. भंडारा, (म.रा.)** ||171

44) सोशल मीडिया का युवाओं पर प्रभाव
**सुशील कुमार गुप्ता, कोरबा** ||175



40

# सद्यस्थितीतील भारतातील राजकीय पक्ष एक दृष्टिक्षेप

**प्रा.डॉ. शिवाजी गोविंद दिवाण**
सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,
महिला महाविद्यालय, गेवराई, ता. गेवराई, जि. बीड

***********

**प्रस्तावना:**

भारतीय लोकशाही स्थापनेसाठी मोलाचे योगदान विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे असून, लोकशाही धर्मनिरपेक्ष समाजवाद अशा मूल्यांचा सविस्तर लेखाजोखा भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेत करून देशाची अखंडता आणि सार्वभौमत्वाची मूल्य सर्व जनतेच्या अधिकारांची रक्षित अशी भारतीय संविध ाानाची निर्मिती २६ जानेवारी, १९४९ साली केली. त्याच लोकशाही राष्ट्रामध्ये राजकीय पक्षाची निर्मिती ही जनतेच्या हिताचे व अधिकारांचे रक्षण करण्यासाठी व समाज एकत्रित होण्यासाठी स्वत:चा आवाज शासनकर्त्यांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य पक्ष करतात. यांचेच संवर्धन रचना करण्यासाठी भारतीय संविधानाच्या कलम ३२४ नुसार निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली. संविधानकर्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राजकीय पक्ष आणि विरोधी पक्ष यांना महत्त्वाचे स्थान दिलेले आहे.

याद्वारे जनतेचे प्रश्न शासनापर्यंत पोहोचविणे सोपे होतेलोकशाहीमध्ये राजकीय पक्षांचे अस्तित्व अपरिहार्य आहे.

लोकमत सुसंघटित, प्रभावी करून आपली तात्विक भूमिका आणि कार्यक्रम यांच्या मदतीने बहुमताचा पाठिंबा मिळवून राजकीय सत्ता काबीज करणे. ती सत्ता आपला कार्यक्रम व्यवहारात आणण्याकरिता लोकमत मिळविणे या उद्देशाने राजकीय पक्ष स्थापन केले जातात.

राजकीय पक्षाच्या अनेक व्याख्या दिलेल्या आहेत. त्यापैकी काही प्रमुख व्याख्या खालीलप्रमाणे आहेत.

**डॉ. लिकॉक:** राजकीय पक्ष म्हणजे, राजकीय घटक या दृष्टीने काम करणारा व कमी अधिक प्रमाणात संघटित असलेला नागरिकांचा समूह होय.

**प्रोफेसर पटेल:** कमी अधिक प्रमाणात संघटित झालेला राजकीय घटक म्हणून कार्य करणारा, मतदानाच्या हक्कांचा उपयोग करून शासन संस्थेवर नियंत्रण ठेवावे. आपल्या सर्वसाधारण धोरणांची अंमलबजावणी करावी, या उद्देशाने एकत्र आलेल्या नागरिकांचा संघ म्हणजे राजकीय पक्ष होय.

**मॅकआव्हर:** एखाद्या तत्वाचा अगर धोरणाचा पाठपुरावा करण्याकरिता संघटित झालेला आणि सरकारच्या बाबतीत ते निर्णायक घ्यावे. याकरिता घटनात्मक मार्गाने प्रयत्न करणारी संघटना म्हणजे राजकीय पक्ष होय.

वरील व्याख्यांवरून असे लक्षात येते की, राजकीय पक्ष म्हणजे विशिष्ट मतप्रणाली आणि तात्त्विक भूमिका यांच्या संदर्भात कार्यक्रम आखून त्या कार्यक्रमाचा पुरस्कार व प्रचार करून त्याद्वारे आपल्या बाजूस बहुमत निर्माण करून त्याच्या साह्याने राजकीय सत्ता हस्तगत करावी व तिचा उपयोग करून घेवून आपल्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करावी आणि राष्ट्रहित किंवा लोकहित साधावे. यासाठी स्वयंप्रेरणेने एकत्र आलले या व्यक्तीचा संघ होय.

**भारतातील राजकीय पक्षाची उद्दिष्टे:**

१. जनतेच्या अधिकाराचे रक्षण करणे, त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडणे व जनेतचा आवाज शासनकर्त्यांपर्यंत पोहोचविणे.

२. जनतेच्या धर्माच्या व वचनाच्या कार्यबंधनात अडकून निवडणूक लढविणे.

**राजकीय पक्षाचे स्वरूप:**

राजकीय पक्ष स्थापन होण्याकरिता विशिष्ट तत्वे आणि उद्दिष्टे याबाबत त्या पक्षाच्या सभासदांमध्ये एकवाक्यता असावी लागते.

तपशीलाच्या बाबतीत मतभेद असले तरी तात्विक भूमिकेला जोपर्यंत धक्का लागत नाही, तोपर्यंत असे मतभेद मान्य केले जातात. तात्विक भूमिका व

धोरण याबाबत एकमत असल्याशिवाय पक्षाच्या कार्यक्रमाला सर्वांची मदत व सहकार्य मिळवू शकत नाही. राजकीय पक्षाचे सभासत्व पूर्णपणे ऐच्छिक असावे लागते. पक्षातील सभासदांचे केवळ एकमत असून चालत नाही, तर ते संघटित असावे लागते. असंघटित अशा समुदायांना आपला कार्यक्रम अमलात आणता येत नाही आणि राजकीय सत्ता प्राप्त झाली तरी, ती टिकवता येणे कठीण आहे.

राजकीय पक्षांना आपली तत्वे आणि कार्यक्रम यांचा प्रसार व प्रचार करून आपली भूमिका लोकांना पटवून राजकीय सत्ता हस्तगत केली पाहिजे. शांततेच्या व घटनात्मक मार्गाने आपली उद्दिष्टे साध्य केली पाहिजेत. सत्तारूढ पक्षाच्या धोरणातील दोष व उणिवा यावर योग्य टीका करून विरोधी पक्षाने आपल्या पक्षाचे धोरण आणि कार्यक्रम लोकप्रिय करून लोकांच्या मनात परिवर्तन घडवून आणले पाहिजे. हे परिवर्तन करत असताना देशातील शांतता व सुव्यवस्था बिघडणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. क्रांतिकारी, घटनाबाह्य, बेकायदेशीर मार्गाने सत्ता प्रस्थापित केली तर लोकशाहीचे अस्तित्त्व धोक्यात येते. हे लक्षात ठेवले पाहिजे. राजकीय पक्षांनी सत्ता हे उद्दिष्ट ठेवण्याबरोबरच लोकहितालाही प्राधान्य दिले पाहिजे. राजकीय पक्षाचे उद्दिष्ट व्यापक असावे लागते. डमंड बर्क यांनी म्हटले आहे की, 'सर्वांनी मान्य केलेल्या विशिष्ट तत्त्वानुसार संघटितरीत्या प्रयत्न करून राष्ट्राचे हित संवर्धन करण्याच्या दृष्टीने एकत्र आलेल्या व्यक्तींचा संघ म्हणजे राजकीय पक्ष होय.' निरनिराळ्या राजकीय पक्षांची स्थापना निरनिराळे उद्दिष्ट साध्य करण्याकरिता झालेली असते. परंतु, त्या सर्वांमध्ये एका बाबतीत साम्य दिसून येते आणि ते म्हणजे प्रत्येक राजकीय पक्षाला उद्दिष्ट किंवा आदर्श राजाबद्दलची विशिष्ट कल्पना असते. राजकीय सत्ता मिळून त्या कल्पनेनुसार प्रत्यक्ष व्यवहारात सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करण्याची त्यांची आकांक्षा असते. मानवी स्वभावातील भिन्नतेमुळे राजकीय पक्ष स्थापन होताना दिसतात. काही वर्गाला आहे ती परिस्थिती कायम रहावी, त्या परिस्थितीत बदल घडू नये असे वाटते. त्याला सनातनी लोक म्हणतात. काही वर्गाला चालू परिस्थिती मान्य नसते, अशांना प्रतिगामी लोक म्हणतात. आहे त्या परिस्थितीत हळूहळू सुधारणा घडवून आणावी अशा प्रकारच्या लोकांना उदारमतवादी म्हणतात. याउलट असलेल्या परिस्थितीत मूलगामी व क्रांतिकारक बदल घडवून आणलेच पाहिजेत, अशा लोकांना पुरोगामी म्हटले जाते. आर्थिक हिसंबंधाचे रक्षण करण्यासाठी काही वर्गाकडून राजकीय पक्षाची स्थापना केली जाते. आर्थिक हितसंबंधाचे रक्षक करण्याकरिता स्थापन झालेले पक्ष सुसंघटित असतात आणि दीर्घकाळ टिकून राहतात.

**राजकीय पक्षाचे कार्य:**

लोकशाही यशस्वी व्हायची असेल तर, राजकीय पक्षाची स्थापना आणि विकास होण्याकरिता आवश्यक अशी परिस्थिती निर्माण झाली पाहिजे. राजकीय पक्षांना आपापले कार्य करण्याचे स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. राजकीय पक्षाकडून केली जाणारी कार्ये त्या परिस्थितीनुसार ठरवली जातात. राजकीय पक्षांना अनेक प्रकारची कामे करावी लागतात. प्रत्येक राष्ट्रापुढे अनेक प्रश्न उभे असतात. त्यापैकी कोणते प्रश्न महत्त्वाचे व ताबडतोब सोडविले पाहिजेत याची माहिती करून घेवून लोक जागश्ती निर्माण करण्याचे कार्य निर्माण करण्याचे कार्य राजकीय पक्षांना करावे लागते. जाहीर सभा, प्रचार, शिबीर, विधायक कार्यक्रम, प्रसंगी लोकशाहीमार्गाने विरोधी पक्षांना जनतेच्या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी मोर्चे, मेळावे घ्यावे लागतात. सार्वजनिक प्रश्नांबाबत प्रत्येक राजकीय पक्षाची निरनिराळी भूमिका असते.

त्यानुसार त्या प्रश्नांची सोडवणूक कशी करता येईल, याबाबतची योजना प्रत्येक पक्षाकडून जनतेसमोर मांडली जाते. विशिष्ट योजना आणि कार्यक्रम जनतेपुढे मांडून लोकमत संघटित व परिणामकारक बनवून लोकशाहीच्या दृष्टीने महत्त्वाचे कार्य राजकीय पक्षाकडून होत असते. प्रतिनिधिक लोकशाही यशस्वी व्हायची असेल तर, मतदारांनी आपल्याला मिळालेल्या मतदानाच्या हक्काची योग्य अंमलबजावणी केली पाहिजे. विशिष्ट योजना अगर कार्यक्रम मतदारापुढे मांडून मतदारांच्या विश्वासास पात्र होण्यासाठी राजकीय पक्षांना विधायक कार्य करावे लागते. उमेद्वारांची निवड करून मतदारांना मतदानाचा हक्क बजावण्याचे महत्त्व

पटवून देवून बहुसंख्येने निवडून येण्याचा राजकीय पक्ष करत असतात. जबाबदार राज्यपद्धती यशस्वी होण्यासाठी एकापेक्षा जास्त राजकीय पक्षाची आवश्यकता असते. सत्तेतील पक्षाच्या धोरणातील दोष दाखवून विधायक टीका करणारा आणि सत्तेतील पक्षाने राजीनामा दिल्यास सत्ता बनविण्यास दुसरा प्रबळ पक्ष कायदेमंडळात असावा लागतो. एकाच पक्षाला कायमची सत्ता मिळाली तर, त्यांची मक्तेदारी स्थापन होवून लोकशाही धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही. याशिवाय राजकीय पक्षांना केवळ राजकारण, निवडणुका नव्हे तर, लोकहिताची कामेही करावी लागतात. प्राथमिक प्रश्नांची सोडवणूक करण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन करण्याकरिता आवश्यक असलेली माहिती जमा करावी लागते.

**पक्ष पद्धतीचे गुंणदोष:**

लोकशाही पक्ष लोकशाही यशस्वी होण्यासाठी राजकीय पक्षाचे कार्य महत्त्वाचे आहे. लोकमताला योग्य वळण देवून ते सुसंघटित आणि प्रभावी करणे हे राजकीय पक्षाचे प्रमुख कार्य आहे. राजकीय पक्षाला पक्षाच्या अस्तित्वामुळे सरकारमध्ये बदल घडवून आणण्याचे कार्य शांततेच्या व घटनात्मक मार्गाने होऊ शकते. राजकीय पक्षाच्या कार्यामुळे भाषावर्ग, धर्म, आर्थिक हितसंबंध यामुळे निर्माण होणारे भेद नष्ट होवून यामुळे राष्ट्रीय ऐक्य व समता प्रस्थापित होण्यास मदत होते. हे जरी खरे असले तरी काही प्रमाणात ही ही पद्धत बरोबर नाही. अलेक्झांडर पोप यांनी तर 'राजकीय पक्ष म्हणजे, थोड्या लोकांच्या न्यायाकरिता अनेकांनी केलेला मुर्खपणा होय', असे म्हटले आहे. राजकीय पक्षात सामील झालेल्या सभासदावर पक्षाशी शिस्त धोरण कार्यक्रम इ. मान्य करण्याचे बंधनकारक असते. त्यामुळे स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाच्या लोकांना पक्षात स्थान नसल्याने त्यांना बाहेर पडावे लागते. पक्षाच्या पद्धतीशिवाय निवडणुकीत निवडून येता येत नाही त्यामुळे अनेक व्यक्ती सभासदत्व स्वीकारतात आणि पक्षाने सांगेल त्याप्रमाणे स्वत:च्या मताविरूद्ध वागतात. यामुळे राजकारणात संधिसाधू व स्वार्थी लोकांचा भरणा होतो. राजकीय पक्षामुळे कायदेमंडळाचे कार्य व्यवस्थित होत नाही. सत्तेतील सभासद सरकारकडून आलेल्या सूचना, ठराव, विधेयक, कार्यक्रम इत्यादी बाबत विचार न करता पाठिंबा देतात. तर, विरोधी पक्षाचे लोक विरोधासाठी विरोध करतात. त्यामुळे देशाहित व सामाजिकहित याकडे लक्ष देण्यासाठी कोणालाही वेळ मिळत नाही. अत्यंत अडचणीच्या व आणीबाणीच्या परिस्थितीत पक्ष पद्धती व सत्ताधारी पक्षाची सत्ता टिकविणे कठीण होते. त्यामुळे लोकशाही ऐवजी हुकूमशाही प्रस्थापित होण्यास पोषक परिस्थिती निर्माण होते. लोकशाहीला मान्य असलेली पक्ष पद्धती सर्व गुणसंपन्न आहे, असे कोणीही मानत नाही. ज्या देशात पक्ष पद्धती स्थापन केली त्या सर्वच देशात पक्ष पद्धतीचे दोष कमी अधिक प्रमाणात दिसून येतात. हुकूमशाहीपासून राज्याला वाचविण्यासाठी एकमेव उपाय म्हणजे पक्ष पद्धती असे प्रतिपादन केले जाते. पक्ष पद्धतीची आजही आवश्यकता आहे. पक्ष पद्धती रद्द करणारे पक्ष पद्धतीतील दोष नष्ट करून त्यात सुधारणा केली. पक्ष पद्धती स्थापन करणे ही काळाची गरज आहे.

**भारतीय राजकीय पक्ष:**

जगातील अनेक देशात निरनिराळे पक्ष पद्धती अस्तित्वात आहेत. त्या पक्ष पद्धती म्हणजे अनेक पक्ष पद्धती, त्रिपक्ष पद्धती आणि एक पक्ष पद्धती. जगातील सर्वात मोठ्या लोकशाही असलेल्या भारत देशात राजकीय पक्ष पद्धतीचा विचार करताना भारतात बहुपक्ष पद्धत अस्तित्वात आहे. १५ ऑगस्ट, १९४७ रोजी स्वतंत्र झालेल्या भारताने संसदीय लोकशाहीचा विचारपूर्वक स्वीकार केला आणि लोकशाहीच्या संवर्धनासाठी बहुपक्ष पद्धतीचा अवलंब केला. भारतातील पक्ष पद्धतीचा विचार करताना असे दिसून येते की, पक्ष पद्धतीत काही प्रमाणात दोष असले तरी, बऱ्याच प्रमाणात बहुपक्ष पद्धती यशस्वी झाल्याचे दिसते. जागृत मतदार, जनता व भारतीय संविधानामुळे हे शक्य झाले आहे, असे म्हणता येईल. बहुपक्ष पद्धती किंवा अनेक पक्ष पद्धती युरोप खंडातील अनेक देशात आणि मुख्य फ्रान्समध्ये अनेक पक्ष पद्धतीत सर्वच पक्षाचे संख्याबळ कमी असते. त्यामुळे कोणत्याही एका पक्षाला निर्विवाद बहुमत मिळू शकत नाही. राज्यात अनेक पक्ष स्थापन झाले म्हणजे त्यांच्या मार्फत निरनिराळे विचारप्रवाह आणि प्रश्नांची सोडवणूक करण्याचे मार्ग जनतेसमोर येतात. भारतीय राजकीय प्रश्नांचा विचार करता अनेक पक्ष राष्ट्रहित व समाज हित समोर ठेवून कार्य केल्याचे दिसते. १५ मार्च, २०१९ रोजी निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या राजकीय पक्षाच्या यादीत भारतामध्ये एकूण २३३४ राजकीय पक्ष आहेत. ०८ राष्ट्रीय पक्ष आहेत. २६ राज्यस्तरावरील पक्ष आहेत आणि इतर २३०१ नोंदणीकृत

पक्ष आहेत. यापैकी महाराष्ट्रात १५ नोंदणीकृत पक्ष आणि ०२ राजकीय पक्ष अस्तित्वात आहेत.

भारतीय शेतकरी कामगार पक्ष, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस, बहुजन समाज पार्टी, भारतीय जनता पक्ष, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी भारतीय कम्युनिस्ट पक्ष, नॅशनल पीपल्स पार्टी हे आठ राजकीय पक्ष आहेत आणि जनता दल युनायटेड, अण्णाद्रमुक, द्रविड मुन्नेत्र कळघम, तेलगु देशम, शिवसेना यासारखे नोंदणीकृत पक्ष राज्यपातळीवर आहेत. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना स्वातंत्र्यपूर्व काळात १८८५ रोजी झाली. या पक्षाचे निवडणूक चिन्ह पंजा आहे या पक्षाने भारतीय स्वातंत्र्यलढ्यात महत्त्वाचे कार्य केल्यामुळे जनमाणसात व गांधी व नेहरू यांच्यामुळे चांगली प्रतिमा समाजात निर्माण झाली होती. म्हणून १९५२ पासून दीर्घकाळ भारतात हा पक्ष सत्तेवर राहिला. पंडित नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी, सोनिया गांधी यांच्या नेंतृत्वात पक्ष सत्तेत होता. स्वतंत्रलढ्याची किनार लाभलेल्या पक्षाची अवस्था आज दयनिय दिसून येते. परंतु, एकसंघपणे कार्य केले तर, पक्षाला भविष्यात भवितव्य आहे असे म्हणता येईल. आज या पक्षाचे नेतृत्त्व खासदार राहुल गांधी, पक्षाचे नवीन अध्यक्ष मल्लीकार्जुन खरगे व प्रियंका गांधी, सोनिया गांधी करत आहेत.

**बहुजन समाज पक्ष:**

या पक्षाची स्थापना बहुजन समाजाला संघटित करून 'जिसकी जितनी संख्या भारी, उसकी उतनी सत्ता में भागीदारी' यानुसार मान्यवर काशीराम यांनी सत्तेचा फॉर्म्युला तयार करून उत्तरप्रदेश सारख्या मोठ्या प्रांतात सत्ता काबीज करून प्रस्थापितांना धक्का दिला. आज या पक्षाचे नेतृत्व मायावती करत आहेत. या पक्षाचे निवडणूक चिन्ह हत्ती आहे.

**भाजप:**

या पक्षाचे पूर्वीचे नाव जनसंघ होते. हिंदुत्त्ववादी विचारप्रणाली असलेल्या या पक्षाची स्थापना श्यामाप्रसाद मुखर्जी आणि दीनदयाळ उपाध्याय यांच्या नेतृत्वात झाली. १९५२ ला केवळ दोन सदस्य असलेला हा पक्ष आज बहुमताने सत्तेत आहे. पक्ष वाढीसाठी माननिय अटल बिहारी वाजपेयी व लालकृष्ण अडवाणी यांचे नेतृत्व प्रभावी ठरले. आज नरेंद्र मोदी हे देशाचे पंतप्रधान असून, देशातील अनेक राज्यात भाजपची सत्ता आहे. नरेंद्र मोदी यांच्यामुळे या पक्षाला नवी झळाळी आली आहे. या पक्षाचे सध्याचे अध्यक्ष जे. पी. नड्डा हे आहेत.

**राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी:**

भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसमधून फुटून सोनिया गांधीच परदेशी मुद्दा उचलून धरून राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीची स्थापना केली. या पक्षाचे चिन्ह हे घड्याळ आहे. या पक्षाचा राजकीय स्तरावर वावर असला तरी, महाराष्ट्र वगळता इतरत्र प्रभाव दिसून येत नाही. शरद पवार पंतप्रधान व्हावे ही अनेकांची इच्छा आहे. परंतु, बहुमताचा आकडा पाहता हे शक्य नसल्याचे दिसते. सर्व विरोधी पक्षाचे नेतृत्त्व करण्याची क्षमता शरद पवार यांच्याकडे असल्याचे जाणकार सांगतात. उद्याचा भविष्यकाळ राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचा असल्याचेही सांगितले जाते. तरी भारतीय जनतेच्या मनाचा थांगपत्ता कधीही लागत नाही, असे दिसून येते.

**भारतीय कम्युनिस्ट पक्ष:**

कार्ल मार्क्सच्या विचारावर अढळ श्रद्धा असणारा व कामगार, कष्टकरी यांचा विचार करणारा पक्ष म्हणून भारतीय राजकारणात या पक्षाचा दबदबा आहे. अनेक वर्षे ज्योती बसू यांच्या नेतृत्त्वाखाली पश्चिम बंगालमध्ये हा पक्ष सत्तेत होता. पक्षाचे निवडणूक चिन्ह लाल बावटा व विळा आहे. भारतात काही राज्यात प्रभावी पक्ष म्हणून काही पक्षांचा उल्लेख करावा लागेल. भारतात काही राज्यात प्रभावी पक्ष आहेत. महाराष्ट्रात शिवसेना पक्षाची स्थापना १९६४ साली झाली. बाळासाहेब ठाकरे यांनी या पक्षाची स्थापना करून महाराष्ट्रातील मराठी माणसाला अन्यायाविरूद्ध लढण्यासाठी बळ दिले. याच शिवसेनेची १९९५ मध्ये सत्ताही आली होती. आज या पक्षाचे नेतृत्त्व उद्धव ठाकरे करत असले तरी, एकनाथ शिंदेंच्या नेतृत्त्वाखाली त्यामध्ये गट तयार झाला आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाने धनुष्यबाण हे मूळचे चिन्ह गोठवून दुसरे चिन्ह बहाल केले आहे. आंध्रप्रदेशमध्ये तेलगु देशम, तामीळनाडूमध्ये मुन्नेत्र कळघम, आसाममध्ये आसाम गण परिषद, गोव्यातील गोमंतक पक्ष, केरळमधील मुस्लीम लीग, खासदार ओवीसी यांची एम. आय. एम., राज ठाकरेंची मनसे, महादेव जानकर यांची राष्ट्रीय समाज पक्ष, आंबेडकरवादी रिपब्लिकन पक्ष यांचाही राजकीय वर्तुळात प्रभाव दिसून येतो.

**समारोप:**

राजकीय पक्षांचा सारांश रूपाने विचार करताना असे म्हणता येईल की, निकोप लोकशाहीसाठी जनहित व राष्ट्रीयहित समोर ठेवून प्रत्येक राजकीय पक्षाने

कार्य केले पाहिजे. राजकीय पक्ष लोकशाहीत महत्त्वाची भूमिका ठरू शकतो. राजकीय पक्षाच्या अस्तित्त्वावर राजकीय विचारवंताचे वेगळे मत असू शकते, तरी सुद्धा भविष्यात पक्षपद्धती लोकशाहीत महत्त्वाची भूमिका वटवू शकतो. परंतु, सर्व पक्षांनी देशातील विविध प्रश्न समोर ठेवून कार्य करून समता, स्वातंत्र्य, बंधुता, आर्थिक सुधारणा त्याचबरोबर देशातील विविध घटकांचे विविध प्रश्न समोर ठेवून कार्य केले तर राजकीय पक्षाची प्रतिमा उजाळणे समाज आणि लोकशाहीसाठी हे आवश्यक आहे, असे माझे मत आहे

**संदर्भ ग्रंथसूची:**

१. भारतीय राजकीय विचारवंत, डी. आर. साबळे.

२. आधुनिक राज्यशास्त्र, प्रा. रामचंद्र महादेव गोखले.

३. महामानवाच महाग्रंथ, दुष्यंत कटारे

४. भारताचे शासन आणि राजकारण, प्रा. लांडगे पंडित शिवराम

५. भारतीय लोकशाही समोरील आव्हाने, प्रा. बाळ कांबळे, डॉ.एकनाथ खांढवे, डायमंड पब्लिकेशन, २०१७, पुणे.

६. भारतीय लोकशाही स्थिती आणि गती, पंडित शेषराव नलावडे, चिन्मय प्रकाशन, २०१७, औरंगाबाद.

७. भारत की राजव्यवस्था, एम. लक्ष्मिकांत, टाटा मैग्राहिल प्रकाशन, २०११, नई दिल्ली.

८. डॉ. दिलीपसिंह निकुंभ, भारतीय राजकीय विचारवंत, प्रशांत पब्लिकेशन, २०२०.

९. काचोळे दा. भ., समाजशास्त्रीय संशोधन पद्धती, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, २००५.

१०. सुरेवाड दिलीप, लोकशाही एक चिंतन, लोकसाहित्य प्रकाशन, औरंगाबाद, २००३.

११. फडके भालचंद्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लोकशाहीविषयक चिंतन, पिंपळापुरे बुक डिस्ट्रयश्ब्युटर्स, नागपूर,२०११.

□□□

41

# अवधी लोकोक्तियों में माघ मास का मौसम विज्ञान से अन्तर्सम्बन्ध

**प्रो. हरीशकुमार शर्मा**
अध्यक्ष–हिन्दी विभाग,
सिद्धार्थ विश्वविद्यालय, कपिलवस्तु सिद्धार्थनगर

**श्रीमती कुसुम देवी**
शोध छात्रा — हिन्दी विभाग,
सिद्धार्थ विश्वविद्यालय, कपिलवस्तु सिद्धार्थनगर

**********

लोकोक्तियाँ, मुहावरे, पहेलियाँ, लोक तुक्का, बालगीत, बाल खेलगीत आदि लोक साहित्य के अन्तर्गत आते हैं। सुविधानुसार इन सबको प्रकीर्ण साहित्य के अन्तर्गत सम्मिलित किया गया है।

डॉ० कृष्णदेव उपाध्याय एवं डॉ० श्रीराम शर्मा ने इन्हें लोक साहित्य की प्रकीर्ण विधाओं की श्रेणी में रखा है। डॉ० कृष्णदेव उपाध्याय ने इन्हें 'लोक सुभाषित' नाम से भी पुकारा है, किन्तु यह नाम पूर्ण अर्थबोध कराने में असमर्थ है, क्योंकि लोक सुभाषित के अन्तर्गत लोकोक्ति, मुहावरे तथा पहेलियों को ही लिया जा सकता है। कुछ विद्वानों ने 'शिशुगीत' को भी 'लोक सुभाषित' के अन्तर्गत सम्मिलित किया है, जो उचित प्रतीत नहीं होता। डॉ० मुक्तेश्वर तिवारी का यह आक्षेप कि 'प्रकीर्ण' का शाब्दिक अर्थ लिया जाय तो 'बिखरा हुआ' या 'फुटकर' साहित्य से बोध होता है। अतएव पूरे लोकसाहित्य के किसी एक वर्ग को 'प्रकीर्ण' साहित्य मानकर चलना तर्कसंगत नहीं प्रतीत होता। तिवारी जी का यह कथन तर्कसंगत जरूर लगता है, किन्तु लोकोक्ति, मुहावरा, पहेलियाँ, लोक तुक्का तथा बालगीत आदि में काफी समानता होने के कारण अध्ययनार्थ सुविधानुसार 'प्रकीर्ण साहित्य' के अन्तर्गत रखना अनुचित प्रतीत नहीं होता।[१]

# Great MobileApp


Check out the Perfect mobile app
For Research Publication

## For college and university teachers and research scholars

Available on the iphone Apps Store

g+ Get in the Goo

IMPACT FACTOR 9.154 iijif




**विद्यावार्ता** इस अँड्रॉइड ॲप के माध्यम से किताबों का प्रकाशन, शोध जर्नल्स प्रकाशन, उच्च शिक्षा तथा शैक्षिक कार्यसंबंधी इन्फॉर्मेशन आसान तरीके से उपलब्ध की गई है। कॉलेज एवं विश्वविद्यालयो के अध्यापक और अनुसंधान करने वाले शोधार्थी के लिये विद्यावार्ता ॲप एक महत्वपूर्ण उपलब्धी हैं। गुगल प्ले स्टोअर से निम्न लिंक द्वारा ॲप डाऊनलोड करे।

## Our Service

- Peer reviewed Research Journals with Impact Factor
- Ph.D. /M.Phil Thisis In book Format with ISBN
- Seminars Special Issue Publication in Print & Online


**Publisher & Owner**

*Archana Rajendra Ghodke*

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh, Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra)

₹400/-

ISSN-2319 9318

**Edit By** Dr. Gholap Bapu Ganpat